# परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## प्रि-बीड मिटींग दिनांक १५.०९.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेले (मिनीट्स)

| निविदेचे नांव | | ठाणे महानगरपालिका परिवहन सेवा बसेसच्या संचलनाकरीता कंत्राटी पध्दतीने ४०० वाहन वाहक पुरविणेबाबत. | | |
|---|---|---|---|---|
| अ क्र | पान क्रमांक/ निविदेतील अट क्रमांक | निविदेतील मुद्दा/निविदेतील अट | संभावीत निविदाकाराची सुचना | निविदा पुर्व बैठकीत परिवहन प्रशासनाने घेतलेला अंतिम निर्णय |
| १ | ७/xii | शासकिय/निमशासकिय/खाजगी आस्थापना यांचेक्डे नियमित किमान २०० कंत्राटी वाहन वाहक पुरविल्याबाबतचा किमान ३ वर्षाचा अनुभवाचा दाखला | सदयस्थितीत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वाहन वाहक पुरविण्याचे कंत्राट अस्तित्वात नाही. त्यामुळे अशा प्रकारचा अनुभवाचा दाखला मिळणे अशक्य आहे. आणि जर अशाप्रकारे एखादा निविदाकार उपलब्ध झाला तर त्याची एकाधिकारशाही निर्माण होईल. त्याकरीता स्कील्ड – सी संवर्गातील कर्मचारी पुरविण्याचा अनुभव असणा-या निविदाकारास प्राधान्य दयावे. | शासकिय / निमशासकिय / खाजगी आस्थापना यांचेकडे नियमित किमान २०० कंत्राटी स्कील्ड-सी संवर्गातील कर्मचारी पुरविल्याबाबतचा किमान ३ वर्षाचा अनुभवाचा दाखला |
| २ | ९/१० | यशस्वी निविदाकारास निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा रक्कमेच्या ५ % सुरक्षा अनामत रक्कम रोखीने अथवा बँक गॅरेन्टी स्वरुपात परिवहन सेवेकडे दयावी लागेल. बँक गॅरेन्टी ही ठाणे मुंबई परिसरातील राष्ट्रीयकृत बँकेची पांच अधिक सहा महिने करीता वैध असलेली दयावी लागेल. | सदर प्रशासनाने निविदा दस्तावेजात नमूद केलेली सुरक्षा अनामत ही रक्कम जवळजवळ २ कोटी ३ लक्ष पर्यन्त जाते. सदर रक्कम एकरकमी बँक गॅरेन्टी स्वरुपात अथवा रोखीने भरणा करण्याची आर्थिक क्षमता असलेले निविदाकार मिळणे अशक्य आहे. सदर रक्कम ही निविदा कामाच्या १ % करण्यांत यावी. तसेच सदरची बँक गॅरेन्टी परिवहन सेवेकडे जमा करण्याचा कालावधी देखील जास्त आहे. तेव्हा ही सुरक्षा अनामत रक्कमेची टक्केवारी व कालावधी कमी करण्यांत | यशस्वी निविदाकारास निविदा मंजूर झाल्यानंतर निविदा रकमेच्या ५ % सुरक्षा अनामत रक्कम रोखीने अथवा बँक गॅरेन्टी स्वरुपात परिवहन सेवेकडे दयावी लागेल. बँक गॅरेन्टी ही ठाणे मुंबई परिसरातील राष्ट्रीयकृत बँकेची पाच वर्ष + सहा महिने करीता वैध असलेली दयावी लागेल.<br>बँक गॅरेन्टी ही ४०० वाहकांची संख्या लक्षात घेऊन नमूद केलेली आहे. तथापि, परिवहन प्रशासनास एकदम ४०० वाहक लागणार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | यावा.कालावधी हा तीन वर्षाचा करण्यांत यावा. | नाहीत. सुरुवातीस २०० वाहकांसाठी नियमानुसार<br><br>आवश्यक ती बँक गॅरेन्टी यशस्वी निविदाकाराने भरावयाची असून, नंतर ज्याप्रमाणे प्रशासनास आवश्यकता भासेल त्या टप्प्यानुसार त्या त्या वाहकांच्या संख्येनुसार सुरक्षा अनामत रक्कम रोखीने किंवा बँक गॅरेन्टी स्वरुपात भरावयाची आहे. तथापि सुरक्षा अनामत रक्कम बँक गॅरेन्टीचा कालावधी हा प्रशासनाने नमूद केलेप्रमाणे ५ वर्ष + ६ महिने एवढयाच कालावधीकरीता वैध असलेलीच दयावी लागेल. |
| ३ | १४/१८ | कंत्राटदाराचे कंत्राटी वाहक हे परिवहन सेवेची तिकीट विक्रीची रक्कम वसुल करुन परिवहन सेवेकडे जमा करणार असल्याने सुरक्षिततेची हमी म्हणुन कंत्राटदाराने प्रत्येक कंत्राटी वाहकांकडून अनामत रक्कम रुपये १५,०००/- घेऊन ती सुरक्षा अनामत रक्कमेपोटी परिवहन सेवेकडे (बिनव्याजी) आगाऊ भरणा करणे बंधनकारक राहील. | सदरची सुरक्षा अनामत रक्कम ही १५ हजाराऐवजी १० हजार करण्यांत यावी. | कंत्राटदाराचे कंत्राटी वाहक हे परिवहन सेवेची तिकीट विक्रीची रक्कम वसुल करुन परिवहन सेवेकडे जमा करणार असल्याने सुरक्षिततेची हमी म्हणुन कंत्राटदाराने प्रत्येक कंत्राटी वाहकांकडून अनामत रक्कम रुपये १५,०००/- ऐवजी रुपये १०,०००/- घेऊन ती सुरक्षा अनामत रक्कमेपोटी परिवहन सेवेकडे (बिनव्याजी) आगाऊ भरणा करणे बंधनकारक राहील. |

परिवहन व्यवस्थापक
परिवहन सेवा,ठामपा.ठाणे.